May ~~Sept.~~ 14

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. साऱ्या विकासनीतीची ह्या अनुषंगानं पुनर्रचना केली गेली.*

*दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं?*

*अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा आकडेवारीच्या आधारे शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद 'कल्पवृक्ष'च्या सौजन्यानं आणि अनुमतीनं क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.*

❑ २०११-१२ मध्ये सरकारी खर्चाचा ३०% भाग हा कर्जावरच्या व्याजाचा होता. सरकारचा सर्वाधिक खर्च ह्याच बाबीवर होत होता. त्या तुलनेत संरक्षणावर ८% खर्च होत होता; तर आरोग्य आणि शिक्षण ह्यांवर मिळून २%पेक्षाही कमी रक्कम खर्च होत होती.

❑ २००७-८मध्ये आरंभ झालेल्या मंदीमुळे सप्टेंबर २००८ नंतर जगभरातील बाजार कोसळले. आपल्या अर्थ-व्यवस्थेवरचा ह्याचा आघात कमी करण्यासाठी सरकारला मोठ्या प्रमाणात भांडवल ओतावं लागलं. २००८-९मध्ये अशा प्रकारे १२०० अब्ज रुपये (२७ अब्ज डॉलर) ओतले गेले. ही रक्कम जीडीपीच्या २%हून अधिक होती.

### समाजाची स्थिती : आहेरे, नाहीरे आणि अति-आहेरे

❑ लंडनच्या 'न्यू इकॉनॉमिक फाउंडेशन'नं विश्व बँकेच्या आकडेवारीच्या आधारे असा अंदाज केला आहे की, १९९० ते २००१ ह्या कालावधीत जगाच्या दरडोई उत्पन्नातल्या १०० डॉलर वाढीपैकी अवघे ०.६ डॉलर हे दारिद्र्यनिर्मूलनाच्या ध्येयासाठी—दिवसाला १ डॉलर ह्या दारिद्र्य-रेषेखालच्यांची स्थिती सुधारण्यासाठी—उपयोगी पडले. ह्याचा अर्थ असा की, गरिबाला प्रतिदिन १ डॉलर अधिक मिळण्यासाठी गरीब नसणाऱ्याला १६५ डॉलर अधिक द्यावे लागतात.

❑ १९९१ मध्ये आर्थिक सुधारणा सुरू होण्याच्या सुमारास 'मानव विकास निर्देशांका'नुसार (ज्यात साक्षरता, सरासरी आयुर्मान, दरडोई उत्पन्न ह्यांचा समावेश होतो) भारताचा क्रमांक जगातल्या देशांत १२३वा होता. २००९मध्ये तो १३४ वर घसरला.

❑ असंघटित क्षेत्रातील समस्यांचा विचार करणाऱ्या अर्जुन सेनगुप्ता समितीच्या म्हणण्यानुसार, २००७ मध्ये ७७% भारतीय (८३.६ कोटी लोक) दिवसाला २० रु.पेक्षा कमी उत्पन्नात जीवन कंठत होते. ही संख्या स्वातंत्र्याच्या वेळच्या एकूण लोकसंख्येच्या अडीच पट आहे.

❑ भारतातील दारिद्र्याचा अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या तेंडुलकर समितीनं आपला अहवाल २००९मध्ये नियोजन मंडळाला सादर केला. त्यात असं म्हटलेलं आहे की, २००४-५मध्ये गरिबांचं लोकसंख्येतलं प्रमाण ग्रामीण भागात ४१.८%, तर शहरी भागात २५.७% होतं. ह्यासाठी जी दारिद्र्य-रेषा गृहीत धरण्यात आली होती, ती ग्रामीण भागात प्रतिव्यक्ती प्रतिदिन १५ रुपये; तर शहरी भागात २० रुपये अशी होती.

❑ भारताचं दरडोई उत्पन्न प्रतिदिन रु.१५० आहे. भारतातल्या ८०% जनतेचं उत्पन्न त्याहून कमी आहे.

❑ भारतातल्या कुपोषित लोकांची संख्या जगात सर्वाधिक आहे. उप-सहारीय आफ्रिकी देशातल्या एकूण कुपोषित लोकसंख्येपेक्षाही ही संख्या अधिक आहे. एफएओच्या अंदाजानुसार २००४-६

(पृष्ठ २ वर)

June-14

रात्रंदिवस वापरतात, ते परिणामतः रस्त्यावरील बस किंवा ... [illegible]

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय २

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. साऱ्या विकासनीतीची ह्या अनुषंगानं पुनर्रचना केली गेली.*

*दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं?*

*अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा आकडेवारीच्या आधारे शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद 'कल्पवृक्ष'च्या सौजन्यानं आणि अनुमतीनं क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.*

### पर्यावरणाची स्थिती

❑ अलीकडेच प्रकाशित झालेल्या एका वृत्तान्तानुसार भारताचं पार्यावरणिक पदचिन्ह जगात तिसऱ्या क्रमांकाचं आहे. सर्वांत मोठं पदचिन्ह आहे अमेरिकेचं, नि दुसऱ्या क्रमांकावर आहे चीन. देशात धारणाक्षम पद्धतीनं उपलब्ध होऊ शकतात त्याच्या दुप्पट नैसर्गिक संसाधनं भारतीय वापरत आहेत. गेल्या चारेक दशकांत माणसांना पोसण्याची निसर्गाची क्षमता वेगानं घटून जवळपास निम्मी झाली आहे.

❑ देशातल्या सर्वांत गरीब ४०% जनतेपेक्षा सर्वांत श्रीमंत ०.०१% भारतीयांचं पार्यावरणिक पदचिन्ह ३३० पटीनं मोठं आहे. एखाद्या औद्योगिकदृष्ट्या विकसित, संपन्न अशा देशातल्या नागरिकाच्या सरासरी पदचिन्हाच्याही ते १२ पट आहे. सर्वांत श्रीमंत अशा १% भारतीयांचं पदचिन्ह हे संपन्न देशातल्या एखाद्या नागरिकाच्या दोन-तृतीयांश आहे; तर सर्वांत गरीब ४०% भारतीय जनतेपेक्षा ते १७ पट मोठं आहे. म्हणजेच, ज्याच्याकडे मोटारगाडी आणि लॅपटॉप आहे असा भारतीय हा जवळपास १७ गरीब भारतीयांइतकी संसाधनं वापरतो. हा वापर २.३ 'विश्व-नागरिकां'च्या संसाधन-वापराइतका आहे. (जगातल्या नागरिकांचं सरासरी दरडोई उत्पन्न २००७मध्ये सुमारे १०,००० डॉलर होतं.)

❑ पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या, २००९च्या, 'पर्यावरणाची स्थिती' ह्या अहवालात म्हटलेलं आहे : 'वातावरणातील संभाव्य बदलांमुळे भारताची अन्नसुरक्षा धोक्यात येऊ शकते. दुष्काळ आणि महापुरांची वाढती संख्या आणि तीव्रता ह्यांमुळे लहान आणि सीमान्त शेतकऱ्यांच्या कृषिउत्पादनावर दुष्परिणाम होईल.' संपूर्ण देशातलं धान्योत्पादन लक्षणीयरीत्या घटण्याची शक्यता आहे.

❑ जागतिक कर्बोत्सर्जनातला भारताचा वाटा सध्या जवळपास ८% आहे. वेगानं वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेमुळे तो प्रतिवर्षी वाढत आहे. हाच वेग कायम राहिला, तर भारताचा दरडोई कर्बोत्सर्ग २०३०पर्यंत तिप्पट होईल, असा अंदाज आहे.

❑ भारत निम्म्याहून अधिक ऊर्जा दगडी कोळशापासून मिळवतो. कोळसा-खाणींचं व्यवस्थापन करणाऱ्या 'कोल इंडिया'नुसार आपल्याकडचे कोळशाचे साठे पूर्वी समजले जायचे तितके अधिक नाहीत. सध्याच्या विकासदरानुसार हे साठे ८० वर्षं पुरतील. विकासदरात भविष्यात होणारी वाढ गृहीत धरल्यास ते केवळ ३०-४० वर्षांतच संपतील. असं असूनही, अ-पारंपरिक ऊर्जास्रोतांसाठी एकूण ऊर्जाखर्चाच्या अवघ्या १.२८% रकमेची तरतूद केली गेली आहे.

❑ देशाचे अधिकाधिक भाग पाण्याच्या बारमाही टंचाईनं ग्रस्त होत आहेत. भारत हा जगामध्ये भूजलाचा सर्वाधिक अतिउपसा करणारा देश आहे. देशाच्या अनेक भागांत,

२५५.१५

Earth - part 2. (pg 3)

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय

3

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. साऱ्या विकासनीतीची ह्या अनुषंगानं पुनर्रचना केली गेली.*

*दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं?*

*अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा आकडेवारीच्या आधारे शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला आहे. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद 'कल्पवृक्ष'च्या सौजन्यानं आणि अनुमतीनं क्रमशः प्रसिद्ध करीत आहोत.*

आघात भीतीजनक आहेत. चुनखडी आणि संगमरवरासाठीच्या स्फोटांनी उद्ध्वस्त झालेल्या अरवली आणि शिवालिक पर्वतरांगा; लोहखनिज वा बॉक्साईटसाठी भुईसपाट झालेले गोवा, मध्य प्रदेश आणि ओडिशातले डोंगर; जळणाऱ्या कोळशानं भस्म झालेले पूर्व भारतातले भूभाग; युरेनियम-उत्खननामुळे किरणोत्सर्गी बनलेले झारखंडातले टापू : आर्थिक 'विकासा'पायी होणाऱ्या विध्वंसाचेच ही सारे पुरावे आहेत.

१९९१पासून जगातले काही बडे खनन-उद्योग भारतात गुंतवणूक करत आहेत. रिओ टिंटो झिंक (ब्रिटन), बी.एच्.पी. (ऑस्ट्रेलिया), अल्कॅन (कॅनडा), नॉर्स्क हायड्रो (नॉर्वे), मेरिडिअन (कॅनडा), डी बीअर्स (द.आफ्रिका), रेथिऑन (अमेरिका) आणि फेल्स डॉज (अमेरिका), इत्यादी बड्या उद्योगांचा ह्या यादीत समावेश आहे. ह्यांपैकी बऱ्याच उद्योगांचा पार्यावरणिक व सामाजिक इतिहास भारतीय उद्योगांइतकाच, किंवा कधीकधी त्याहूनही वाईट आहे.

खनन-उद्योगांची अधिकाधिक चांदी व्हावी अशीच धोरणांमधल्या बदलाची दिशा राहिली आहे. उदाहरणार्थ, ह्या उद्योगांना भाडेपट्टीनं घेता येणाऱ्या अधिकतम क्षेत्राची मर्यादा १९९६मध्ये २५ चौ.कि.मी. होती : ती आता ५,००० चौ.कि.मी.पर्यंत वाढवण्यात आली आहे; अधिक मोठ्या क्षेत्रांना जनसुनावणीच्या अटीतून वगळण्यात आलं आहे, इत्यादी. २००२च्या राष्ट्रीय खजिज-धोरणात तर असं सुचवण्यात आलं आहे की, पर्यावरणविषयक नियमांचं पालन हे उद्योगांसाठी ऐच्छिक असावं!

भारताची आणि जगाची हाव पुरी करण्यासाठी जी मागणी-संचालित अर्थव्यवस्था कार्यरत झाली आहे, तिचा एक अपरिहार्य परिणाम म्हणजे उत्खनन-क्षेत्रातील नियमनाचा अभाव. अवैध उत्खननाचे जे पुरावे एकामागून एक समोर येत आहेत, त्यावरूनच ही बाब लक्षात येत आहे. २००६ ते ९ ह्या काळात कर्नाटकात अवैध खननाच्या ११,८९६ घटना; तर, आंध्रात ३५,४११ घटना उघडकीला आल्या.

## निर्यात : आपल्या भविष्यकाळाचा लिलाव

सरकारनं दिलेल्या प्रोत्साहनामुळे भारताच्या निर्यातीत २००३-४पासून प्रतिवर्षी २५%हून अधिक वाढ झाली. २०११-१२मध्ये भारताची निर्यात ३०० अब्ज डॉलरांवर पोहोचली. काही प्रमाणातली निर्यात वांछनीय वा आवश्यक मानली, तरी जबाबदार निर्यात-धोरणात किमान पुढील कळीच्या मुद्द्यांचा तरी समावेश असायला हवा :

* ज्यांची निर्यात होणार अशा वस्तूंपासून, तुटवडा वा भरमसाठ किंमतींमुळे देशाचे नागरिक वंचित होणार नाहीत.
* अशा वस्तूंचं उत्खनन वा उत्पादन हे पर्यावरणदृष्ट्या धारणाक्षम असेल.
* ज्या क्षेत्रांमधून खनिजं बाहेर नेली जात आहेत, तिथल्या स्थानिक जनसमुदायांच्या हक्कांचा आदर ठेवला जावा.
* हे जनसमूह हे त्या संसाधनांचे प्रथम लाभार्थी असले पाहिजेत.

दुर्दैवानं, जागतिकीकरणाच्या युगातील निर्यातीनं ही सारी तत्त्वं धाब्यावर बसवली आहेत. खनिजांप्रमाणेच, सागरी मत्स्योत्पादनांत वाढ हे निर्यातीचं एक प्रमुख उद्दिष्ट राहिलं आहे. त्यांची निर्यात १९९०-९१मध्ये १,३९,४१९ टनांची होती; ती २००८-२००९मध्ये ६,०२,८३५ टन इतकी वाढली. पूर्वी काही थोड्या उत्पादनांची डझनभर देशांकडे निर्यात व्हायची. आता ९० देशांकडे ४७५

(पृष्ठ ४ वर)

Aug. 14

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय ४

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. आता दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

१,४६,१८० टन होतं, ते २०१२मध्ये ८,००,००० टनांपर्यंत वाढण्याची शक्यता होती.

दोन दशकांपूर्वी कल्पनाही केली जाऊ शकत नव्हती, इतक्या प्रकारांनी प्लॅस्टिकनं भारतीयांच्या जीवनात प्रवेश केला आहे. १९९१पासून, विविध प्रकारांच्या प्लॅस्टिकांची देशातील उत्पादनक्षमता १० लाख टनांवरून ५० लाख टनपेक्षा अधिक झाली आहे. २०००-०१मध्ये भारतात प्रत्येक दिवशी ५,४०० टनांचा प्लॅस्टिकचा कचरा तयार होत होता : वर्षाला सुमारे २० लक्ष टन. (त्यानंतरची आकडेवारी उपलब्ध नाही.)

### उपभोगांमधली विषमता

'ग्रीनपीस इंडिया'नं २००७मध्ये, भारतातल्या वातावरणीय बदलविषयक मुद्द्यांवर एक इतिवृत्त प्रकाशित केलं. त्यातून असं दिसून आलं की, लोकसंख्येचा एक छोटासा हिस्सा प्रचंड प्रमाणावरील कर्बोत्सर्जनाला जबाबदार आहे. कर्बोत्सर्गाची दरडोई सरासरी मात्रा कमी दिसत होती, ती कमी कर्बोत्सर्जन करणाऱ्या मोठ्या लोकसंख्येमुळे. मूठभरांचं प्रचंड कर्बोत्सर्जन त्यामागे लपून राहत होतं. 'ग्रीनपीस इंडिया'ला असं आढळलं की, भारतातले श्रीमंत (प्रतिमाह उत्पन्न रु. ३०,००० वा अधिक) हे गरिबांपेक्षा (प्रतिमाह उत्पन्न रु. ३,००० पेक्षा कमी असणारी निम्म्याहून अधिक लोकसंख्या) ४॥ पट अधिक कर्बोत्सर्जन करतात. प्रतिमास रु. ८,००० पेक्षा अधिक उत्पन्न असणारे १५ कोटी भारतीय हे प्रतिव्यक्ती २॥ टन ह्या मर्यादेच्या केव्हाच पलीकडे गेले आहेत. जागतिक तापमानवाढ २°से.च्या आत राखायची असेल, तर ही मर्यादा अत्यावश्यक आहे, असं शास्त्रज्ञांचं मत आहे. दिवे, पंखे, टीव्ही हे आता प्राय: प्रत्येक घरात असले, तरी त्यांचा अधिक संख्येनं आणि अधिक प्रमाणात वापर होतो तो श्रीमंत घरांमध्ये. काही उपकरणं तर मुख्यत्वे, किंवा केवळ, श्रीमंत घरांतच वापरली जातात : वातानुकूलक, विजेवरचे जलतापक, कपडे धुण्याची यंत्रं, स्वयंपाकघरातील विविध उपकरणं, डीव्हीडीचालक, संगणक, इत्यादी. खनिज तेलांवर चालणाऱ्या वाहनांचा वापर— मोटारगाड्या आणि विमानं—ही तर केवळ श्रीमंतांशीच संबंधित बाब आहे.

कर्बोत्सर्जन हा उपभोगांतील विषमता दर्शवणारा केवळ एक निर्देशक आहे. श्रीमंत वर्ग उपभोगतो त्या सर्व वस्तू, वापरतो त्या सर्व सेवा, आणि फेकून देतो तो सर्व कचरा ह्यांची त्यात बेरीज केली, तर श्रीमंतांच्या जीवनशैलीचा पर्यावरणावरचा आघात हा, गरीब वर्गाच्या आघाताच्या तुलनेनं, खुपेल इतका अप्रमाण दिसू लागतो.

(क्रमश:)

---

## अ-मंगल कार्य

तास सोडायची; सार्वजनिक नळाच्या तोट्या चोरीला गेल्यामुळे दिवस-दिवसभर सुरू असणाऱ्या नळांकडे त्याच नळावर पाणी

---

## प्रयत्न साध्या समारंभांचे

**जयंत नेने, पुणे**

मंगलकार्याच्या आमंत्रणपत्रिकेत 'कृपया

संभाषण शक्यच होत नाही. अक्षतांसाठी तांदूळ वाया घालवणे मला पटत नाही, आणि बफे पद्धतीने एका हातात बशी सांभाळत उभ्याने जेवणे आवडत नाही; त्यामुळे 'नको ते जाणे' ही माझी वृत्ती.

Sept.14

# भारताचं जागतिकीकरण : आघात आणि पर्याय ५

*भारताच्या आर्थिक सुधारणांना १९९१मध्ये प्रारंभ झाला. त्या धोरणाची ३ मुख्य अंगं होती उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण. आता दोन दशकांनंतर आता कोणतं चित्र दिसतं? अर्थव्यवस्था, समाज आणि पर्यावरण ह्यांचं ह्या काळात काय झालं?*

*ह्या साऱ्याचा शोध घेऊन **असीम श्रीवास्तव** आणि **आशिष कोठारी** ह्यांनी 'Churning the Earth : The Making of Global India' हा ग्रंथ लिहिला. त्यातील निवडक माहिती संकलित करून पुण्याच्या 'कल्पवृक्ष' ह्या संस्थेनं 'Globalization in India : Impacts and Alternatives' ही पुस्तिका २०१२मध्ये प्रकाशित केली आहे. तिचा **दिलीप कुलकर्णी** ह्यांनी केलेला हा मराठी अनुवाद.*

गेलं आहे. १९८०-८१नंतर असं जे वर्गीकरण झालं, त्यापैकी जवळजवळ निम्मं २००१-२नंतर झालेलं आहे.

१९८६च्या पर्यावरण-संरक्षण कायद्याअंतर्गत, १९९१मध्ये सागरकिनारा-नियमन-क्षेत्रांचा (CRZ) अधिनियम लागू केला गेला. सागर-किनाऱ्यांवरचं पर्यावरण वा उपजीविका ह्यांना धोका पोचवणाऱ्या कृतींवर बंधनं आणण्यासाठीच तो होता. मुळीच परिपूर्ण नसलेला, आणि बहुसंख्य राज्यांनी उदासीन राहून राबवलेला असा हा अधिनियम असूनही बरेच सागरकिनारे आणि तिथे राहणारे मच्छिमार समाज ह्यांना त्यामुळे संरक्षण मिळालं. पण, त्यामुळेच तो औद्योगिक आणि व्यापारी हेतू असणाऱ्यांच्या डोळ्यांत सलू लागला, आणि त्यांनी सरकारवर आणलेल्या दबावामुळे मूळ अधिनियमात २० सवलती दिल्या गेल्या. २००५-६मध्ये तर केंद्र शासनाच्या असं मनात आलं की, हा अधिनियम पूर्णपणेच बदलावा, आणि किनारी क्षेत्रांत काय झालेलं चालेल आणि काय चालणार नाही, हे राज्य सरकारांनीच ठरवावं. 'हे व्यापारी आणि औद्योगिक हितसंबंधीयांपुढे गुडघे टेकणं आहे', अशी जळजळीत टीका नागरिकांच्या संघटना आणि मच्छिमार-समुदायांनी (राष्ट्रीय मच्छिमार व्यासपीठासारख्या जाळ्यामार्फत) केली आहे.

जागतिकीकरणाच्या काळात मोठ्या प्रमाणात विस्तारलेला आणखी एक व्यवसाय म्हणजे पर्यटन. १९९६मधली देशान्तर्गत पर्यटकांची १४ कोटींची संख्या २००७मध्ये ५२.७ कोटी इतकी वाढली. ह्याच काळातली विदेशी पर्यटकांची संख्या २२.९ लाखांवरून वाढून ५०.८ लाख झाली. पर्यावरण आणि संस्कृती जपण्यासाठी, तसंच संरक्षणाच्या दृष्टीनं संवेदनशील असणारे लडाख, अंदमान-निकोबार बेटं, लक्षद्वीप, पूर्वांचल असे, पूर्वी पर्यटकांना प्रवेश नसणारे भारताचे कित्येक भाग गेल्या काही वर्षांत खुले केले गेले आहेत. जागतिकीकरणपूर्व काळातही जिथे पर्यटनाला अनुमती होती असे भाग आज अतिरेकी, अनियंत्रित पर्यटनामुळे आक्रोश करत आहेत. नियमांच्या उल्लंघनाच्या शेकडो घटना गेल्या काही वर्षांत घडल्या आहेत. उदाहरणार्थ, सागरकिनारा-संरक्षण-अधिनियमाची पायमल्ली करून बांधलेले पर्यटक-निवास. केरळातील एकट्या कोवालमच्या किनाऱ्यावर अशी १५००हून अधिक अतिक्रमणं नोंदली गेली आहेत. कान्हा, बांधवगड, कॉर्बेट, पेरियार, रणथंभोर, बंदीपूर, नागरहोळे, इत्यादी जे व्याघ्रप्रकल्प वा अन्य संरक्षित क्षेत्रं आहेत, त्यांच्या भोवती पर्यटक-निवासांचा वेढा पडलेला आहे. त्यांचा ताण त्या क्षेत्रांतल्या सोयीसुविधांवर आणि कर्मचाऱ्यांवर येतो; पर्यटनाचा आघात कमीत कमी व्हावा म्हणून घातलेल्या बंधनांचं ते शब्दशः आणि भावशः वारंवार उल्लंघन करतात; आणि राखीव क्षेत्राच्या देखभालीत त्यांचा काडीचाही सहभाग किंवा योगदान नसतं.

*(क्रमशः)*

---

## अ-मंगल कार्य

**टोचणीबद्दल आभार!**

सगळ्या पाहुण्यांना रस असतो.

त्यातही देवाणघेवाण (हुंडा हा कायद्याने गुन्हा ठरूनही अप्रत्यक्षपणे हुंड्याची वाढत चालली आहे.

आपल्या मुलीचं किंवा मुलाचं लग्न ही खरं तर एक आनंदाची बाब असायला